**-: प्रेसनोट दिनांक - १२/०२/२०२५ :-**

**आरोपी लोकसेवक ०१) अरूण भानुदास माळगे, वय - ४९ वर्षे, पद - मंडळ अधिकारी, कोडोली, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर रा. शिराळा नाका, कचरे गल्ली, इस्लामपूर, ता. वाळवा, जि.सांगली, ०२) योगेश यशवंत गावडे, वय - २९ वर्षे, पद - ग्राम रोजगार सेवक, कोडोली, ता.पन्हाळा, रा. शिनगारे गल्ली, कोडोली, ता. पन्हाळा, जि. सांगली, ०३) सुशांत सुभाष चौगुले, वय - ३० वर्षे, खाजगी इसम रा. शहापूर, ता.पन्हाळा, जि. कोल्हापूर यांनी लाच मागणी करून स्विकारलेबाबत........**

---

तक्रारदार यांचे वडीलांचे नावे काडोली ता.पन्हाळा येथे गट नं १३७५ मध्ये एकुण ७०.४७ गुंठे जमिन असुन त्यातील १० गुंठे जमिन ही तक्रारदार यांचे आईचे नावे बक्षीसपत्रव्दारे केली होती, सदर बक्षीसपत्र हे पन्हाळा रजीस्टर कार्यालय येथे दिनांक १०/०१/२०२५ रोजी केले होते. दिनांक ११/०२/२०२५ रोजी तक्रारदार यांचेकडे योगेश गावडे हे आले व त्यांनी ते सर्कल अरूण माळगे यांचेकडे काम करत असल्याचे सांगुन तक्रारदार यांना तुमचे गट नं १३७५ ची बक्षीस पत्राची नोंद घालण्याकरीताचे काम आमचे कार्यालयामध्ये आल्याचे सांगुन त्याकरीता २५००/- रू हे सर्कल माळगे व मला दयावे लागतील असे म्हणुन तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केली होती. म्हणुन तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे तक्रार दिली होती.

तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे दिलेल्या तक्रार अर्जाप्रमाणे पडताळणी केली असता पडताळणीमध्ये आरोपी कमांक ०२ गावडे याने मंडळ अधिकारी माळगे व स्वत:साठी २५००/- रूपयांची मागणी करून तडजोडीअंती २०००/- रूपये लाचेची मागणी केली. तसेच आरोपी कमांक ०३ चौगुले व आरोपी कमांक ०१ माळगे यांनी आरोपी कमांक ०२ गावडे यांनी मागणी केलेल्या लाचेस दुजोरा दिला तसेच तक्रारदारास आरोपी कमांक ०१ माळगे यांनी आरोपी कमांक ०२ गावडे याच्याकडे लाच रक्कम देणेस प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाले

त्यानंतर सापळा कारवाई आयोजीत केली असता पंच साक्षीदारांचे समक्ष तक्रारदार यांचेकडुन आरोपी कमांक ०२ **योगेश यशवंत गावडे याने मागणी केलेप्रमाणे २,०००/- रूपये** स्विकारलेने त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. सदरबाबत आरोपी लोकसेवक ०१) अरूण भानुदास माळगे, वय - ४९ वर्षे, पद - मंडळ अधिकारी, कोडोली, ता. पन्हाळा, जि.कोल्हापूर रा. शिराळा नाका, कचरे गल्ली, इस्लामपूर, ता. वाळवा, जि.सांगली, ०२) योगेश यशवंत गावडे, वय - २९ वर्षे, पद - ग्राम रोजगार सेवक, कोडोली, ता.पन्हाळा, रा. शिनगारे गल्ली, कोडोली, ता. पन्हाळा, जि. सांगली, ०३) सुशांत सुभाष चौगुले, वय - ३० वर्षे, खाजगी इसम रा. शहापूर, ता.पन्हाळा, जि. कोल्हापूर यांचेविरूध्द कोडोली पोलीस ठाणे, कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रकीया सुरू आहे.

सदरची कारवाई श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे. श्रीमती डॉ. शितल जानवे, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे श्री. विजय चौधरी, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार तसेच वैष्णवी पाटील, पोलीस उप अधीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली श्री बापु साळुंके पोलीस निरीक्षक, पो.हे.कॉ. श्री सुनिल घोसाळकर, पो.ना.सचिन पाटील, पोकॉ संदिप पवार, चा.स.फौ. गजानन कुराडे अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबतच्या तकारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

**१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१**
**२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.**
**३) वैष्णवी पाटील, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९७६४१४०७७७. कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.**
**४) हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४.**
**५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.**